महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

■ वर्ष अकरावे ■ अंक १ ला ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०२० ■ पाने -२०



## संपादक

**श्री.दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

**श्री. अनिल माळी,** नाशिक, मो. ९८५०८१८६४४
Email: anilrmali@yahoo.co.in

**श्री. किरण मोरे,** अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

### कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे मो. ९००४९२४७३१ |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती मो. ९८२२२०४०७० |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे**, सांगली मो. ९८९०३८४४०० |
| सहसंघटक | – | **श्री. अनिल माळी**, नाशिक मो. ९८५०८१८६४४ |
| सदस्य | – | **प्रा. निनाद शाह**, सोलापूर मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | – | **श्री. रोहन भाटे**, कराड (सातारा) मो. ९४२२००४८०० |
| सदस्य | – | **श्री. सचिन मेन**, पालघर मो. ८४४६२४८८८४ |
| सदस्य | – | **श्री. अनिल महाजन**,वरणगाव–जळगाव मो. ८८०६१९८०४० |

### सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगांबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


## संपादकीय


दिगंबर गाडगीळ
dgadgil09@gmail.com


### आश्वासक काही

यावर्षी मार्च महिन्यात कोरोनाने हातपाय पसरण्यास सुरुवात केली आणि जनजीवन ठप्प होऊ लागले. त्यामुळेच एप्रिल आणि जुलैचे अंक छापील स्वरूपात काढता आले नाहीत. मात्र डिजिटल अंक आपण उपलब्ध केले होते. हा ऑक्टोबरचा अंक थोड्या उशिराने छापील स्वरूपात उपलब्ध होत आहे. कोरोना हा निसर्गाचा प्रकोप आहे. आणखी काही काळ त्याची धग जाणवणार आहे. नव्या वर्षात त्यावरची लस उपलब्ध होईल. लस हे औषध नाही, तो एक प्रतिबंधक उपाय असेल.

आता कोरोना काळातील निर्बंध शिथिल होऊ लागले आहेत; पण अनेक नागरिकांना तेवढाही धीर नव्हता. त्यांनी निर्बंध कसोशीने पाळले नाहीत. त्यामुळे कोरोनाचा मुक्काम लांबण्यास हातभार लागला. अजूनही सार्वजनिक ठिकाणी वावरत असताना तोंडावर मास्क, सुरक्षित अंतर ठेवणे, वारंवार हात धुणे आदी उपायांचा अवलंब करीत राहावे लागेल.हा अंक हाती येईल बहुधा नोव्हेंबर महिन्यात. दोन वर्षांपासून आपण ५ ते १२ नोव्हेंबर या काळात पक्षीसप्ताह पाळण्यास सुरुवात केली आहे. आता राज्य शासनानेही तो पक्षिसप्ताह पाळण्याचा निर्णय घेतला आहे.यावर्षीचा सप्टेंबर महिना हा 'फुलपाखरू मास' पाळला गेला. ठिकठिकाणी फुलपाखरू निरीक्षण, त्यांच्या नोंदी घेतल्या गेल्या. प्रश्नमंजुषा घेतली गेली. महाराष्ट्र राज्याने 'ब्ल्यू मॉर्मन' हे राज्य फुलपाखरू घोषित केल्यानंतरचे हे पुढचे पाऊल आहे.

भारताला सुदीर्घ सागर किनारा लाभला आहे. एकंदर आठ राज्यांना त्याचा लाभ आहे; पण महाराष्ट्राने अलीकडे पांढरी चिप्पी (Sonneratia alba) या वृक्षाला राज्य कांदळवन वृक्ष घोषित करून पहिले पाऊल टाकले आहे. कांदळवत हे जैवसृष्टीचे आश्रयस्थान असते. या पावलामुळे कांदळवन संरक्षण-संवर्धन यास हातभार लागेल, अशी आशा आहे.दरवर्षीप्रमाणे ऑक्टोबर महिन्याचा पहिला सप्ताह वन्यजीव सप्ताह म्हणून पाळला गेला. कोरोना निर्बंधामुळे त्यावर काही मर्यादा आल्या असणार.अलीकडेच नांदूर मध्यमेश्वर अभय प्रदेशाला रामसर दर्जा प्राप्त झाला आहे.

अशा काही घटनांमुळे निसर्ग रक्षण पातळीवर काही आश्वासक घटना घडल्या, असे म्हणता आले.

**मुखपृष्ठ – Common Kestrel सामान्य खरूची छायाचित्र – श्री. प्रशांत निकम,अमरावती**

# * अध्यक्षीय *




**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773


गेले सात महिने संपूर्ण जग कोविड-१९ च्या आकस्मित आलेल्या जागतिक महामारीस तोंड देत आहे. या संकटामुळे घोषित झालेल्या लॉकडाऊनचा प्रत्येकाच्या दैनंदिनीवर चांगला/वाईट परिणाम झाला आहे. मात्र आता सारेच कंटाळले आहेत, स्थलांतर करण्यासाठी उत्सुक आहेत. लॉकडाऊनमध्ये अख्खा उन्हाळा आणि पावसाळा गेला आणि आता हिवाळा तोंडावर येऊन ठेपला आहे. पक्षी स्थलांतरास सुरुवात झाली आहे आणि परिसरातील पाणथळी पुन्हा गजबणार आहेत. लॉकडाऊन संपुष्टात आल्याने पक्षिमित्रसुद्धा पक्षी निरीक्षणासाठी बाहेर पडणार आहेत. मात्र जरा जपून, लॉकडाऊन संपले तरी कोरोना अजून संपलेला नाही.

मागील एप्रिल आणि जुलैचे पक्षिमित्र अंक लॉकडाऊनमुळे छापता आले नाहीत, मात्र वाट न बघता, न थांबता आपले संपादक व त्यांच्या सहकाऱ्यांनी अंकाचे साहित्य तयार ठेवले आणि आम्ही पीडीएफ स्वरूपात अधिक जास्त मजकूर घालून, रंगीत, आकर्षक असा अंक तयार करून तो ऑनलाईन पद्धतीने सर्वांपर्यंत पोहोचविला. हा अंक आवडल्याचे अनेकांनी कळविले. समाज माध्यमांद्वारे हा अंक पक्षीमित्र परिवाराच्या बाहेरसुद्धा अनेकांपर्यंत पोहोचला आणि तो आवडल्याचेसुद्धा अनेकांनी कळविले. आता सर्व व्यवहार पूर्ववत सुरू होत आहेत, तेव्हा ऑक्टोबरचा अंक पुन्हा छापील स्वरूपात आपल्या हाती पोहोचत आहे.

भारतीय पक्षिविश्व व पक्षिअभ्यासशास्त्रास जागतिक स्तरावर पोहोचवणारे कै. डॉ. सालिम अली व महाराष्ट्रातील तमाम पक्षिनिरीक्षकांसाठी कायम आदरस्थानी असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय मारुती चितमपल्ली या दोन्ही उत्तुंग व्यक्तींचा महाराष्ट्रातील पक्षिविश्वाशी खूप जवळचा संबंध असून त्यांनी रचलेल्या पायावरच आज महाराष्ट्रातील पक्षीमित्र वाटचाल करीत असतात. योगायोगाने या दोहोंचा जन्मदिवस हा नोव्हेंबर महिन्यात येतो. मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिन ०५ नोव्हेंबर असून पै.डॉ. सालिम अली यांची जयंती दि. १२ नोव्हेंबरला असते. मारुती चितमपल्ली यांना त्यांचे जन्मदिनी शुभेच्छा देण्याकरिता व डॉ. सालिम अली यांना आदरांजली देण्यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतर्फे ०५ नोव्हेंबर या आ. मारुती चितमपल्ली यांचे जन्मदिनापासून ते १२ नोव्हेंबर या कै. डॉ. सालिम अली यांचे जयंतीपर्यंतचा आठवडा पक्षिसप्ताह म्हणून साजरा करण्यात यावा, असा ठराव अंबाजोगाई येथे दिनांक ७/८ जानेवारी २०१७ ला पार पडलेल्या ३० व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनात पारित करण्यात आला होता. त्यानुसार २०१७ पासून हा सप्ताह साजरा केला जात आहे. मागील तीन वर्षात संस्थेने मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी व संपर्क करून संलग्नित संस्था, राज्यभर विखुरलेले पक्षिनिरीक्षक, पक्षिविषयक कार्यरत महाराष्ट्रातील संस्था व आजीवन सभासदांच्या माध्यमातून हा सप्ताह उत्साहात साजरा केला गेला. हा पक्षी सप्ताह शासन स्तरावरूनसुद्धा साजरा केला जावा यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र व बहार नेचर फाउंडेशन, वर्धा या दोन्ही संस्थांच्या माध्यमातून वन विभाग तथा शासनाकडे सातत्याने पाठपुरावा व प्रयत्न केला जात होता. त्यास अलीकडे यश प्राप्त झाले आहे. श्री. दिलीप विरखडे यांची यामध्ये मला मोलाची साथ लाभली, त्यामुळे हा पाठपुरावा सातत्याने करता आला हे येथे नमूद करावे लागेल.

पक्षी सप्ताह शासन स्तरावरून साजरा करण्यात यावा या आपल्या विनंतीस दि. ०७ ऑगस्ट २०२० रोजी पार पडलेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, या सभेमध्ये हा प्रस्ताव मंडळाचे सदस्य तथा महाराष्ट्र पक्षीमित्रचे सभासद श्री. यादव तरटे यांनी मांडला होता. त्यास मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष तथा माननीय मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे, वनमंत्री माननीय संजयजी राठोड,

सदस्य सचिव तथा राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) माननीय नितीनजी काकोडकर तथा सर्व सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावास मान्यता दिली त्याबद्दल महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे मा. मुख्यमंत्री, मा. मंत्रिमहोदय, सदस्य सचिव तथा सर्व सदस्यांचे मन:पूर्वक आभार. याबाबतची शासनाची अधिसूचना लवकरच प्राप्त होईल अशी आशा आहे. हा उपक्रम कशा प्रकारे राबविला जावा याबाबतचे विचार मी आपल्याकडून शासनास व संबंधित विभागास कळविले असून ही अधिसूचना येत्या नोव्हेंबर पूर्वी निघाल्यास यावर्षीचा पक्षी सप्ताह साजरा करण्यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्रचे सर्व सभासद, संलग्नित संस्था यांचे सोबत शासनाचा वन विभागसुद्धा सहभागी होणार आहे. यापुढे हा पक्षी सप्ताह शासनाचा उपक्रम म्हणून साजरा होत असताना वन्यजीव सप्ताहप्रमाणे वन विभागाच्या स्तरावरून साजरा झाल्यास त्याची व्याप्ती वाढून पक्षिविषयक जनजागृती आणि संवर्धन या विषयास चालना मिळेल. तेव्हा नोव्हेंबरच्या ५ तारखेपासून पक्षी सप्ताह साजरा करण्यासाठी आता सज्ज व्हायचे आहे.

नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पक्षी स्थलांतर मोठ्या प्रमाणात झालेले असेल, आपल्या परिसरातील पाणस्थळांवर पक्ष्यांची जत्रा भरलेली असेल, तेव्हा येत्या पक्षी सप्ताहात कोरोनाच्या संकटाची काळजी घेऊन पक्षिनिरीक्षण कार्यक्रमांचे आयोजन करता येईल. याशिवाय या सप्ताहात शाळा व महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, ऑनलाईन पद्धतीने व्याख्याने, सादरीकरणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आदींचे आयोजन करू शकता. महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फेसुद्धा या आठ दिवसाच्या कालखंडात दररोज 'वेबिनार'चे आयोजन करण्यात येणार आहे.

मागील तीन महिन्यांच्या काळात जवळपास ३० नवीन सभासद महाराष्ट्र पक्षीमित्र सोबत जुळले आहेत. त्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत. आपल्या सर्व सभासदांसोबत सध्या इमेल, व समाज माध्यमांद्वारे संपर्क ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी फेसबुकवर आपले एक पेज असून त्यावर आपण आपली माहिती, नोंदी, तथा पक्ष्यांची छायाचित्रे टाकू शकता. व्हॉटसअॅपद्वारे आज सर्वांशी संपर्क साधणे सहज झाले आहे, त्यामुळे यावर सध्या तीन ग्रुप तयार केले गेले असून त्या माध्यमातून एकमेकांशी संपर्क ठेवणे शक्य झाले आहे. पक्षीमित्रच्या आजवर २०० पर्यंत महिला सदस्य असून त्यांपैकी अनेक महिला सदस्या या पक्षी अभ्यास, छायाचित्रण तथा जनजागृती या क्षेत्रात अग्रेसर आहेत, त्यांच्या संपर्कासाठी महिला सदस्यांचासुद्धा एक ग्रुप करण्यात आला असून त्यावर अतिशय मुद्देसूद अशी चर्चा होत असते. या सर्व कामात आपले सभासद श्री. अविनाश कुबल यांचे सहकार्य लाभत असल्यामुळे इमेल आणि संपर्क यामध्ये सातत्य ठेवणे शक्य होत आहे.

लॉकडाऊन जरा शिथिल झाले असले तरी कोरोनाचे संकट अजून टळलेले नाही. हळूहळू कामास पुन्हा सुरुवात झाली असली तरी आपण ती काळजी घेऊन, सामाजिक अंतर पाळून या संकटावर मात करावी लागणार आहे. सुरक्षित रहा, सावध रहा! **धन्यवाद**!!

******

# कावळ्याची सुंदरता



**माणिक पुरी**
परभणी,
९८८१९६७३४६

इंडोनेशियात वास्तव्यात असलेले लेखक 'लिऑल वॅटसन' यांनी 'गिफ्ट ऑफ अन्नोन थिंग्ज' या नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये आवाजाला एक रंग असतो हे अनुभवाअंती सिद्ध केलंय. ढोकरी पक्ष्यांच्या आवाजाला हिरवा रंग असतो. पोपटाची तांबडी किंचाळी लक्ष वेधून घेते. म्हशीच्या रेकण्याचा आणि ढगांच्या गडगडण्याचा आवाज काळा रंग दर्शवतो.

मला वाटतं कावळ्याच्या आवाजालाही एक वेगळा रंग असला पाहिजे. कावळ्याच्या आवाजाच्या रंगाविषयी अनेक पुस्तकातून शोध घेतला पण त्यासंदर्भात पुसटशी माहितीही उपलब्ध नव्हती. कावळ्याच्या आवाजाने माहेरवाशीण सुखावते. तिच्या चेहऱ्यावर हसू उमटते. मुलीला जेव्हा पहिल्यांदा कावळा शिवतो तेव्हा घरातील आनंद ओसंडून वाहतो. नदी घाटावर पिंड उचलण्यापूर्वी कावळ्याची कावकाव सर्वांना सुखावून जाते. कावळ्याचा कंठ जरी काळा असला तरी आवाज मात्र हिरवा असला पाहिजे. कावळ्याची सुंदरता रंगात नसून त्याच्या आवाजात आहे.

**पैल तो गे काऊ कोकताहे।**
**शकुन गे माये सांगताहे ।**

ही रचना संत ज्ञानदेवांची. कावळ्याच्या संदर्भाने व्यापक आशय मांडणारी.

लग्नविधी म्हटलं की गोत्र पाहिलं जातं. पक्ष्यांची अचूक माहिती गोळा करण्यासाठी त्यांचे गण वर्गीकरण करून 'कुल' पाडण्यात आले आहेत. त्यावरून पक्ष्यांचे गोत्र ठरविले जाते. कावळ्याचे 'कॉरव्हस' हे गोत्र आहे. त्या गोत्रावरुन त्याच्या प्रजाती, उपजातीची नोंद घेता येते.

कावळ्याचं निरीक्षण करण्यासाठी जंगलात, पाणवठ्यावर जायची गरज नसते. मानवाच्या वस्तीशेजारी वावरणारा पक्षी म्हणून त्याची ओळख. पक्षितज्ज्ञ किरण पुरंदरे यांनी कावळ्याची ओळख खूप सुंदर पद्धतीने करून दिली आहे. खरं तर चिमणी आणि कावळ्याची ओळख करून देण्याची गरजच नसते. जन्मल्यापासून या पक्ष्यांचे आवाज दररोज कानी पडतात. त्यांचा आणि आपला अनोखा ऋणानुबंध आहे.

एप्रिल महिन्याची सायंकाळ. चटका देणारं ऊन थंडावलंय. पूर्व दिशेकडून अंधार वाढत चाललाय. काही वेळातच अंधाराचं साम्राज्य पसरलं जाईल. परभणीच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चहूबाजूंनी कावळ्याच्या झुंडी झाडावर उतरताना दिसू लागल्या. हजारो कावळे कॉवकॉव करत आपली जागा पटकावण्याचा प्रयत्न करत होते. काही वेळानंतर निरव शांतता. फक्त रस्त्यावरील वाहनांचा आवाज तेवढा उरलेला.

साने गुरुजींच्या एका कथेत स्त्रीला पक्ष्यांची भाषा कळत होती. सासरच्या माहेरच्या गोष्टी ते एकमेकांना सांगत. याविषयीच्या गोष्टी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राध्यापक कै. श्री. पद्माकर टाक सर रंगवून सांगत असत.

लहानपणी आजीसोबत रानात जायचो. ओढ्याच्या काठानं सरपण गोळा करताना पक्षी आणि त्यांचे आवाज सोबतीला असत. आजी पक्ष्याच्या आवाजाचा अर्थ सांगायची. मला नवल वाटायचं. साने गुरुजींच्या कथेतील स्त्री मला माझी आजी वाटायची. ती कावळ्याच्या गोष्टी सांगायची. 'चिमणीचं घर मेणाचं मेणाचं आणि कावळ्याचं घर शेणाचं शेणाचं'. कथा ऐकताना आनंद व्हायचा. चिमणीचा राग यायचा. कावळ्याची कीव यायची. चिमणी दार उघडायची नाही. कावळ्याची फजिती व्हायची. अशा गोष्टी ऐकताना कधी गोधड्यात झोपी जायचो कळायचं नाही.

प्राथमिक शाळेत '**हुशार कावळा**' कथा ऐकली तेव्हा विलक्षण आनंद झाला. रंग काळा पण हुशार कावळा.

गावातील वड, पिंपळ, आंबा, मंदिराचा पार अशा ठिकाणी कावळे वास्तव्य करतात. त्यास **'काकागार'** म्हणतात. जशी बगळ्यांची 'सारंगागार' तशी कावळ्यांची 'काकागार'. समूहाने राहणारा पक्षी. विणीच्या काळात एका झाडावर चार-पाच कोटरे दिसून येतात. मी अनेक कोटऱ्यांचं निरीक्षण केलंय. भोरच्या जवळ भोलावडे वस्ती आहे. जवळच 'नीरा' नदीचं पात्र. भोलावडे वस्तीच्या पश्चिमेला पुष्कळ आमराई होती. त्या आमराईतून फिरणे आवडायचे. त्या झाडावर असलेली कावळ्यांची घरटी पाहण्यात वेगळाच आनंद मिळायचा. एका घरट्याचं खूप वेळ निरीक्षण करत होतो. काही कावळे शेजारील घरट्यातून काड्या काढून स्वतः च्या घरट्याला बसवत होते. ही चोरीच तर होती.

सौ. निर्मलाताई थोपटे, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य श्री. साईनाथ पाचारणे सर यांनी निसर्ग विषयक अनेक पुस्तके वाचायला दिली. भोरच्या परिसरातील निसर्ग आपल्याशी बोलत राहतो. सर आणि आम्ही विद्यार्थी 'भाटघर' धरण पाहण्यासाठी गेलो होतो. तेथील पक्ष्यांची विविधता पाहून मी हरखून जायचो. पण तिथेही मला कावळे साद घालायचे.

कावळ्यांचं मीलन पाहू नये. अपशकुनी असतं. त्याविषयीच्या अनेक दंतकथा समाजात पसरलेल्या. परंतु पक्षितज्ज्ञ किरण पुरंदरे यांनी कावळ्याच्या नर-मादीचं मीलन पाहिल्याची नोंद केलीय.

**एक साळुंकी आली बाळाला जांभळं देऊन गेली.**
**एक कावळा आला बाळाचं सगळं घेऊन गेला.**

या बालगीताने कावळ्याची प्रतिमा मलीन केली. कावळ्याचं रूप सुंदर नसेल परंतु जगाला सुंदर करण्याचं काम कावळा करतो. तो 'स्वच्छतादूत' म्हणून येतो अन् घाणीचं साम्राज्य नाहीसं करतो.

कावळे मेलेले प्राणी, कीटक, सडलेले अन्न, वनस्पती खातात. कावळे नसते तर? गावातील, शहरातील घाण किती पटीने वाढली असती. हजारो वर्षांपासून कावळे माणसाच्या सहवासात आहेत. पण त्यांचं महत्त्व अजूनही पटत नाही.

मी गुरुवारच्या सायंकाळी दत्तधाम मंदिरात दर्शनाला जायचो. एके दिवशी रस्त्याच्या कडेला एक कावळा दिसला. मी थांबलो. तो मेलेल्या उंदरावर ताव मारण्याच्या प्रयत्नात होता; पण तो उंदीर सुकलेला. त्या कावळ्याने उंदराला हळूहळू रस्त्यावर आणले. तो झाडावर जाऊन बसला. मीसुद्धा झाडाआड लपलो. काही मिनिटात बस आली. उंदराला चिरडले. त्या कावळ्याने उंदराला झाडावर नेऊन फस्त केले.

कावळे आपली घरटी उन्हाळ्यात बांधतात. या पक्ष्याला हवामानशास्त्रज्ञ म्हटलं जातं. त्यांची घरटी वड, पिंपळ, लिंब, आंबा अशा दाट झाडावर आढळून आल्यास पाऊस चांगला पडतो. बाभूळ, खैर, बोर, हिवर अशा झाडावर घरटी दिसल्यास पाऊस कमी पडतो. या पक्ष्यांच्या घरट्याच्या उंचीवरूनही पावसाचा अंदाज बांधता येतो. घरटी झाडाच्या शेंड्याजवळ असतील तर पाऊस चांगला, घरटी गळफांदीला तर अवर्षण पडते. कावळ्याच्या अंड्यावरुन पावसाचा अंदाज घेता येतो. जास्त अंडी जास्त पाऊस. कमी अंडी कमी पाऊस.

जसं महाभारतात अर्जुन हा पूर्णपुरुष आहे असा उल्लेख येतो, तसा पक्षी कुळात कावळा हा पूर्णपक्षी म्हणून ओळखला जातो. याचं कोडंही मला अजून सुटलेलं नाही.

कावळा दिसायला काळा. त्याची लांबी १५ ते १८ इंच. पाय काळे. डोक्याची अर्धी बाजू पांढरट. चोच मजबूत. राखी मान. ४ ते ५ अंडी घालतात. फिक्या निळसर अंड्यावर तपकिरी रेघा व ठिपके असतात. कावळा आणि डोमकावळा असे कावळ्याचे दोन प्रकार आपल्याकडे आढळतात.

कावळ्याच्या आयुष्याबाबत नेहमीच उलट-सुलट चर्चा केली जाते. नेमके कावळ्याचे आयुष्य किती?

**'हाल सातवाहनाची गाथासप्तशती'** (संपादक : स. आ. जोगळेकर) या ग्रंथात कावळ्याच्या संदर्भाने अनेक गाथा येतात. गाथा क्र. १३४ मध्ये कावळा चिरकाल जगतो अशी नोंद वाचायला मिळते. (पान क्र. १००) पण ती काही खरी नसावी असेच वाटते. कारण प्रत्येक जीवाला मरण अटळ आहे.

हिंदू धर्माच्या पुराणात एक आख्यायिका सांगितली जाते. समुद्र मंथनातून निघालेला अमृताचा कलश हस्तगत करण्यासाठी देव आणि दानव यांच्यात शक्ती आणि युक्तीचा वापर होतो. त्यावेळी अमृताचा एक थेंब जमिनीवर उगवलेल्या गवतावर (दुर्वा) पडतो. त्या गवतावर कावळा चोच पुसतो. त्यामुळे कावळ्याला अमरत्व प्राप्त होते अशी रंजक कथा ऐकायला मिळते.

पक्षिमित्र डॉ.संदीप साखरे यांनी कावळ्याच्या आयुष्यासंदर्भात माहिती सांगितली. कावळ्याचे १४ ते १५ वर्षे आयुष्य आहे.

पक्ष्यांचा नैसर्गिक मृत्यू हा एक संशोधनाचा विषय आहे. कावळे केव्हा, कुठे आणि कसे मरतात हे सांगणं फार अवघडच. मनुष्याच्या चुकांमुळे मरुन पडलेल्या कावळ्याभोवती कावळ्यांची मोठी शोकसभा भरली की, काय असे वाटते. आपण त्या कावळ्याला उचलून घेऊ शकत नाही. इतर कावळे आक्रमण करायला तयारच असतात.

कावळ्याचं असणं म्हणजे कोकिळ पक्ष्याला अभयच. कोकिळ पक्ष्यांची अंडी कावळे उबवतात, त्यांच्या पिलांना भरवतात. कंठ फुटल्यावर जाणीव होते. तरीही कावळा स्वतः चा धर्म सोडत नाही. ही खरी कावळ्याची सुंदरता.

अमेरिकन पक्षिशास्त्रज्ञ अॅर्नेस्ट सेटन यांनी कावळ्याच्या सांकेतिक भाषेचा अभ्यास केला. त्यांची भाषा शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. पक्षितज्ज्ञ मारुती चित्तमपल्ली यांच्या **'घरट्यापलिकडे'** या पुस्तकात **'कावळ्याची भाषा'** असा एक स्वतंत्र लेख आहे. तो मुळातून वाचला पाहिजे.

माणसांच्या भाषेप्रमाणं पक्ष्यांची एक स्वतंत्र सांकेतिक भाषा असते. ती पक्ष्यांना जन्मतःच उपजत असते. जगातील सर्व ठिकाणच्या कावळ्यांची सांकेतिक भाषा एकच आहे असं पक्षिशास्त्रज्ञ 'कानरॅड लॉरैन' यांनी मत मांडलय.

वराहमिहीर यांच्या **'काकरूतावली'** या ग्रंथाचा अभ्यास करून अनेकांनी कावळ्यावर संशोधन केले आहे. कावळ्याची सुंदरता टिपण्याचा प्रयत्न केलाय.

आपणही कावळ्याची सुंदरता घेऊन जग सुंदर करूया. पक्ष्यांना अभय देऊया. आलमेलकर यांच्या स्वप्नातील पक्षीजगत रेखाटूया.


******





**छायाचित्र– धनंजय गुट्टे**

# पुस्तक परिचय

# शबल- पक्षी लेखमालेचा सुंदर कोलाज



**दिलीप वीरखडे**
महाराष्ट्र पक्षिमित्र
विदर्भ समन्वयक
मो. **7775883861**





'माळरानावरचा पक्षी अभ्यासक' ही ओळख किरण मोरे यांना पहिल्या पुस्तकाच्या (माळरानावरील चंडोल) माध्यमातून मिळाली. त्याचं दुसरं ई-पुस्तक नुकतंच वाचण्यात आलं. आधी 'ई' काढून कालांतराने 'हार्ड कॉपी' काढणे ही त्याची खासियत! पुस्तकबद्ध केलेल्या पक्ष्यांच्या लेखमालेला 'शबल' हे नामाभिधान तो वापरतो. शबल खंजन(पांढरा धोबी) आणि शबल मिनरंक (कवड्या धीवर) ही दोन नावे माझ्या लक्षात होती; आणि या पक्ष्यांच्या रंगावरून शबल म्हणजे काळ्यापांढऱ्या रंगाचा असलेला,असा अर्थ मला अभिप्रेत होता. काळ्यापांढऱ्या ठिपक्यांचा किंवा रंगीबेरंगी सूत्रबद्ध समूहाला शबल म्हणतात असा उल्लेख लेखक करतो.

द्विरंगी आणि बहुदा बहुरंगी असलेल्या पक्ष्यांच्या दुनियेची सूत्रबद्ध मांडणी करताना 'शबल' हे नाव यथोचित ठरतं. सातत्याने आणि चिकाटीने विभिन्न अधिवासातील पक्ष्यांचा बारकाईने अभ्यास किरण मोरे करतो. निरीक्षणादरम्यान घेतलेल्या नोंदी, दुर्मीळ आणि रंजक घटना व अधिवासांची माहिती देणारी त्याची लेखमाला वृत्तपत्रात प्रकाशित झाली होती. त्यात अधिक-उणे करून हे ई-बुक त्याने सिद्ध केलंय.

पक्ष्यांमधला एक 'बाप' म्हणजे रंगीत पाणलावा (नर), त्याचं वैशिष्ट्य 'एकल पालकत्व' या प्रकरणात मांडतो. बाप जसा अधोरेखीत करतो तश्याच काही संगोपन करणाऱ्या विशेष माता (स्टेप मॉम) म्हणजे उदार अंतकरणाने (?) इतरांची पिले सांभाळणाऱ्या मातांबद्दलही तो तितकाच भरभरून आणि विस्ताराने लिहितो. उन्हाळा हा काही स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांचा वीणकाळ असतो. तलाव व धरणातील बेटांवर या पक्ष्यांच्या वीणवसाहती असतात. विदर्भात व प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यातील काही वसाहतींची माहिती देतानाच त्या वसाहतीला असलेले मुख्य आणि मानवी धोके वाचकांपुढे ठेवतो. दिवसेंदिवस उग्र होत चाललेल्या या समस्यांमुळे नेमके कोणते 'शेष' पक्षी 'नामशेष' होण्याच्या मार्गावर आहेत ते उदाहरणांसह देतो. 'माळरानावरचा चंडोल' या पुस्तकात भेटलेला 'डोंबारी' (चिमण चंडोल) इथे पुन्हा अंडी-पिलांसह भेटतो. ही कथा (वीणक्रम) सांगून तो माळरानावरच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. अनेक प्रजातींचे पक्षी आपल्याकडे हिवाळी स्थलांतरादरम्यान येतात. त्यातील काही उपप्रजातींची ओळख पटविणे खरोखरच अवघड आणि तुमची परीक्षा पाहणारं काम असतं. चिखल्याच्या एका उपप्रजातीची

ओळख लेखक पटवतो. त्यासाठी घेतलेली मेहनत आपल्याला 'क्युरोनिकस डिकोडेड' या प्रकरणात वाचावयास मिळते. ते वाचून 'पक्षिमित्र' व 'पक्षी छायाचित्रकार' याच्या खूप पलीकडे गेलेले प्रकरण म्हणजे 'किरण' याची खात्री पटते. काही पक्षी हे मुळातच 'टिळा' ल्यालेले आहेत. मग तो 'वैष्णव' असो की 'वारकरी'. पण काही पक्षी खाताना किंवा पिताना एवढे धुंद होतात की त्यांना फुलातील परागकणांचे टिळे लागतात. चष्मेवाला, राखी छातीचा वटवट्या असे काही पक्षी फुलांच्या बहरकाळात लाल, केशरी, पिवळे टिळे नकळत लावून परागकण उधळतात. त्याचं सुंदर चित्रण शबलमध्ये येतं. 'पाणपक्ष्यांची तळी' यात अमरावती जिल्ह्यातल्या तलावांचा, त्यावर आढळणाऱ्या पक्ष्यांचा धावता पण सुंदर आढावा घेतलेला आहे. काही पक्षी हे विशिष्ट तलावावरच आढळतात. ती त्या तलावांचीही ओळख बनते. उदा. म्हणजे तुम्हाला दम्वाजेल क्रेन (करकरा क्रौंच) पाहायचा असेल,तर विर्शी तलावावर जावं लागेल. बरं पहाटे जाऊन फायदा नाही! 'ते' भोवतीच्या पण दूरवर असलेल्या गहू आणि हरभऱ्याच्या शेतात 'ब्रेकफास्ट' करीत असतील. नऊ नंतर त्या सुंदर शबल तरुणी झुलपे बिखरत तलावावर गोळा होतात, नाजूक अंगकाठी आणि नजाकतीने तलावाकाठी फिरत राहतात. ही माहिती लेखक देतो आणि दम्वाजेल या फ्रेंच शब्दाचा अर्थ 'तरुण स्त्री' होतो असेही तो लिहितो..

शबलचे मुखपृष्ठ अत्यंत देखणं झालंय. आशय आणि कथनाला पुरेशी पूरक छायाचित्रं यात आहेत. शबल हा शब्द जसा रंगाशी संबंधित आहे तसाच तो सौंदर्य व गुणांशी देखील निगडित आहे. शबल हे 'सौंदर्याचे लक्षण' आहे याची खात्री या पुस्तकावरून पटते. विभिन्न अधिवासातले पक्षी यात येत असले तरी त्यामध्ये एक समान सूत्र वाचकांना जाणवत राहतं. तलावाचं, विभिन्न अधिवासाचं सौंदर्य तर लेखक टिपतोच पण अधिवासाला असलेले धोकेही तेवढ्याच तळमळीने मांडतो. हे लिखाण आणि ही तळमळ अगदी सहज, साध्या, सोप्या शब्दांत येते. 'हे बोल सोपाधी शबलत्वाचे' या एकनाथ भागवतातील ओळीचे स्मरण होते...




**शबल हे ई-पुस्तक गूगल प्ले-बुक स्टोअरवर आणि रिसर्च गेटवर मोफत उपलब्ध आहे.**

https://play.google.com/store/books/details?id=nVbrDwAAQBAJ

https://www.researchgate.net/publication/343600641_sabala_paksilekhamala

******

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

## लाल रानकोंबडा Red Junglefowl (Gallus gallus)

रवींद्र वामनाचार्य
नाशिक
मो.नं. : ९८९०३९०५२७

हा पक्षी प्रामुख्याने हिमालयाच्या तराई जंगलात आढळतो. कश्मिरपासून आसामपर्यंत हिमालयाच्या जंगलात लाल रानकोंबडे आहेत. उत्तर भारतातील सागाचे जंगल, दक्षिण भारतात गोदावरी काठचे जंगल, मध्य प्रदेशातील जंगलात वास्तव्य आहे, तसेच महाराष्ट्रातील नागझिरा अभयारण्य व नवेगाव राष्ट्रीय उद्यानाच्या जंगलातही आहेत.

लाल रानकोंबडा हा पाळीव कोंबडयांचा मूळ पूर्वज आहे. याची लांबी दोन फूट आहे, कोंबडी कोंबडयापेक्षा लहान असते. रान कोंबडा हा लाल भडक दिसतो. डोक्यावर व गळयावर लाल रंगाचा मांसल तुरा असतो व छाती, गळा व मान गर्द लाल असते. गालावर पांढरा ठिपका असतो. त्याची शेपटी भरदार पिसांची विळ्याच्या आकाराची असते. शेपटीच्या पिसांचा रंग हिरवट-काळसर असतो. त्याच्या पाठीवर लाल-काळसर पिसे असतात. बाजूला तपकिरी पिसे असतात. छातीवर काळी पिसे असतात. रंगीबेरंगी पिसे व भारदार शेपटीमुळे हा रानकोबडा रूबाबदार दिसतो.

लाल जंगली रानकोंबडे साग झाडाच्या जंगलात असतात. सकाळी व संध्याकाळी जंगलातील रस्त्यावर चरण्यासाठी बाहेर पडतात. ते खूप भित्रे असल्याने कुणाची चाहूल अथवा आवाज आला तर ते पटकन उडून झुडपात व बांबूच्या राईत लपतात. दुपारी तेथेच विश्रांती घेतात. एक कोंबडा तीन चार कोंबड्यांबरोबर फिरतो तर कधी एकटा भटकतो. कोंबड्याचे मुख्य अन्न म्हणजे धान्य, कोवळे तुरे, नाकतोडे, लहान सरडे, सापसुरळया व किडे मकोडे हे आहे. लाल रानकोंबडा हा संकटग्रस्त प्रजाती असल्याने दिल्लीच्या राष्ट्रीय प्राणी उद्यानाच्या पोषक वातावरणात त्यांच्या सख्येत सफलतापूर्वक वाढ करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

भारतीय टपाल खात्यातर्फे दि. ०२ सप्टेंबर १९९६ रोजी २० व्या जागतिक कुक्कुट संमेलनाच्या निमित्ताने लाल रानकोंबड्यावर पाच रुपयाचे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे.



# पक्षी पुरंदरचे (पुणे)



**प्रा. कैलास बगडाणे**
पुणे
(वनस्पतीशास्त्र)
मो. ९८५०२७१८६२

पुरंदर तालुक्यातील सपुष्प आणि अपुष्प वनस्पतींचा ७-८ वर्षांपासून अभ्यास करताना मी पक्षी प्रेमात कधी पडलो ते कळलेच नाही. माझ्याकडे सोनी ह्या जपानच्या कंपनीचा कॅमेरा आहे. ५०० मीटरपर्यंतच्या सजीवांचे फोटो त्यात उत्तम येतात. महाविद्यालयाच्या अभ्यास सहलीत मी नेहमी कॅमेरा हाताळत होतो. अनायासे मागील शताकातलीही अनेक उपक्रमांचे, वनस्पतीची, प्राण्यांची छायाचित्रे माझेकडे आहेत, छायाचित्रे आपल्याशी बोलतात यात दुमत नाही.

Aristotle यास जीवशास्त्राचा जनक म्हटले जाते. त्या नंतर Carl. Linneus ने वर्गीकरणाच्या पद्धती आणि द्विनाम पद्धत शोधली. वर्गीकरणाच्या अनेक पद्धती आहेत. पेशी संख्यानुसार प्राण्याचे एकपेशीय आणि बहुपेशीय असे दोन प्रकार आहेत. वनस्पती जगताप्रमाणे प्राणिजगत हे सुद्धा दोन प्रकारात वर्गीकृत आहे. पाठीचा कणा असणाऱ्या प्राण्यांना पृष्ठवंशीय आणि नसणाच्या प्राण्यांना अपृष्ठवंशीय म्हणतात. अंडज आणि जरायुज (गर्भात वाढणारे) हे प्रजनन पद्धतीवर आधारित दोन गट आहेत. अधिवासानुसार प्राण्यांचे भूचर, जलचर, उभयचर आणि खेचरे (हवेत संचार करणारे) असे वर्गीकरण आहे. (वर्गीकरण शास्त्राचे महत्त्व अनन्य साधारण आहे).

पक्षी, फुलपाखरे कॅमेरात टिपणे वाटते तितके सोपे नाही, कारण पक्षी, फुलपाखरे सतत जागा बदलत असतात, इकडून तिकडे उडत असतात. पक्षी आणि फुलपाखरे यांचे छायाचित्रण करताना मला सेकंदाचे महत्त्व समजले, जे athleet यास चांगले माहीत असते. रेकॉर्डिंगच्या भानगडीत मी फारसा पडलो नाही, फोटोग्राफीवरच भर दिला. एकाचवेळी अचानक दोन वेगवेगळे पक्षी मला दिसल्यावर कमी अंतरावरील पक्ष्याचा फोटो मी प्रथम घेतला, किंवा जो अधिक सुंदर आहे, होता त्याचा, कारण मी नेहमी असे गृहीत धरले की आलेली संधी काही सेकंद असणार आहे. पाच सुंदर पक्षी फोटो घेण्या अगोदरच उडून गेले. मात्र ९५ पक्ष्यांचे फोटो मी घेऊ शकलो. फोटोग्राफी करताना आपले भान जागेवर असणे गरजेचे असते. सरपटणाऱ्या प्राण्यांपासून काळजी घेतली पाहिजे.

मध्यंतरी मला जाणीव झाली की, आपण महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे आजीवन सभासद झालो पाहिजे, औपचारिक बाबी पूर्ण केल्या, खूप आनंद आहे.

पक्षी इतर प्राण्यांच्या तुलनेत आकर्षक असतात त्यामुळे ते सर्वांना आवडतात. आपल्या राज्यात पक्षी निरीक्षणासाठी अनेक स्थळे आहेत. नांदूर- मध्यमेश्वर (नाशिक), कर्नाळा (bird sanctury), मयुरेश्वर (बारामती), रेहकुरी (काळवीट) अभयारण्य, कवडेपाट (पुणे), उजनी धरण (बारामती) आदी. जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी जमेल तिथे गेले पाहिजे.

मला लाभलेल्या पक्ष्यांची माहिती मी इंग्रजीत संकलित केली आहे. त्यामुळे त्यांची नावे येथे इंग्लिश मध्ये नमूद करीत आहे. विविध संदर्भ पुस्तकातून आणि इंटरनेटवरील अभ्यास गटातील तज्ज्ञ व्यक्ताच्या मदतीने शास्त्रीय नावेसुद्धा शोधून काढली आहेत, परंतु विस्तार-भयास्तव येथे देत नाही व लिखाणास अति शास्त्रीय स्वरूप प्राप्त होईल.

Asian koel, Asian koel: Kokila, Black Drongo, Dhobi, Brahmny starling myna, Bulbul, Common Salunki: Myna, Crane little egret, Crested Bul-bul:Narad, Dove, Baya weaverin Sugran, Eurasian Common coot, Great cormorant non-breeding plumage, Green bee eater : Veda Raghu, Kingfisher: Khandya, Kite (Black), Large grey babbler, Laughing Dove, Neelkanth: Indian Roller bird / Blue Jay,

Oriental white eye : Small passerine bird, Parrot, Pied Bushchat Male, Pond Heron, Indian robin female, Red wattled lapwing: Titvee, Sandpiper, Shore bird, Scaly breasted munia, Southern Coucal Bhardwaj, Spot billed duck, Washerman: Indian robin, White Browed / Large pied Wagtail, Hoopoe, Wooly /white necked Stork etc

मी २०० पेक्षा अधिक slides असलेले पशु-पक्ष्यांवर आधारित सादरीकरण (PPT) माझ्या आणि इतर महाविद्यालयातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थी वर्गासाठी दरवर्षी आयोजित करतो. त्यात नाविन्याचा ध्यास असतो. दरवर्षी नवनवीन शोधांचा समावेश असतो. पक्ष्याचा फोटो, त्याचे शास्त्रीय नाव यामुळे ते विद्यार्थ्यांना खूपच भावते.

पक्षी निरीक्षणाची विशिष्ट वेळ आणि काळ असतो, म्हणजेच सकाळी आणि हिवाळ्यात अधिक संख्येने आपल्याला पक्षी पाहायला मिळतात. मला यश मिळण्याचे कारण म्हणजे मी तालुक्यात सकाळी ७.०० वाजता पोहचत असे, कुणीतरी सह प्रवाश्यासह. एकदा आलेला अनुभव म्हणजे, पक्षी रस्त्याच्या कडेला झाडावर बसलेला होता, मी फोटो घेणार तोपर्यंत दुचाकी वरील तरुण मुलाने गरज नसताना भोंगा / हॉर्न वाजवला आणि माझा हिरमोड झाला. मात्र आपल्याला निसर्ग नियम पाळायला हवेत, जसे एका-दोघांनीच, मोठ्याने न बोलता जंगल सफर केली पाहिजे. पशु-पक्ष्यांना आपल्यापासून काहीही त्रास होणार नाही हे पाहिले पाहिजे. विशिष्ट अंतरावरूनच त्यांचा अधिवास निहाळला पाहिजे.

हरणी गावाजवळ पाहिलेला आणि कॅमेरात टिपलेला नीलकंठ मला सगळ्यात जास्त भावला, आणि ज्या दिवशी हा योग आला त्या दिवशी मला खूप आनंद झाला आणि त्या दिवसानंतर मला नेहमी खूप बरे वाटले. अर्थात नवनवीन पक्षी पाहायला मिळणे हे दुग्ध-शर्करा योग असतात. पक्षी नेहमीच खूप सावध असतात, माणसाच्या हालचालीवरून ते त्यांची हालचाल निर्धारित करतात. काही वेळा जेव्हा त्यांच्या लक्षात येते की, ह्या माणसाकडून आपणास धोका नाही, तेव्हा ते आपल्या अगदी जवळ बागडतात. 'Ela Foundation' च्या डॉ. सतीश पांडे सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे तालुक्यातील काम वाखागण्यासारखे आहे. कर्नाळा अभयारण्य फलकावरील मला भावलेल्या दोन ओळी नमूद करत आहे, 'पावलांच्या ठशांशिवाय येथे काही ठेऊ नका, आनंदी, सुखी आठवणीशिवाय येथून काही नेऊ नका.'

******



छायाचित्र- शशांक नगराळे

# आठवणीतून अशी पाखरे येती ।।



सु. मेजर (निवृत्त) जयंत कानडे
919765155560

प्रत्येक पक्ष्याची घरटे बनवायची तऱ्हा वेगळी. कुणी मातीत बोगदा खणतो, कोणी माती चिकटवतो, कुणी नैसर्गिक ढोली शोधतात. दयाळ, बुलबुल कंपासने आखून घेतल्यासारखा गोल कसा करतात, कोण जाणे? शिंपीणीच्या घरट्यात मादीला व नवजात पिल्लांना बसण्यासाठी लावलेल्या अस्तरापुढे आत्ताचे फोमचे बेड फिके पडेल. माझ्या परस बागेत नारळाच्या झाडावर पाऊस पडल्यावर अनेक बया नर घरटे बांधतात. काही पूर्ण होतात तर काही अर्धवटच रहातात. पूर्ण झालेल्या घरट्यातही काही वेळेस वीण होत नाही. बहुतेक होतकरू नर अ‍ॅप्रेन्ट्रीसशीप करत असावेत. कारण मॅडमना घर पसंत पडले तरच पुढचे होणार ना? सुतार, तांबट स्वतःचे घर स्वतःच खोदतात. तर साळुंकीसारखे पक्षी आयत्या घरात घरोबा करतात किंवा चालू संसार उधळून लावतात. साळुंकी तशी आतंकी स्वभावाचीच. साळुंकीच्या आतंकीपणाचे मी दोन प्रसंग स्वतः जवळून पाहिले आहेत. मी सिकंदराबाद येथे ईएमई कॉलेजमध्ये इन्स्ट्रक्टर म्हणून काम करत होतो. माझे क्वार्टर्स इंग्रजांच्या वेळच्या जुन्या ऐसपैस क्वार्टसमध्ये होते. घरामागे किचन गार्डन होती. बागेत पपई, केळी, शेवगा इत्यादी झाडे होती. खिडकीच्या बाहेरच्या बाजूला भिंतीला एक भोक होते. त्यात एक हुप्पेच्या जोडीची विणीची तयारी सुरु होती. नंतर त्यांची दिवसभर भरवायची लगबग बघून पिल्लं झाली असावी. आम्ही बागेत वावरत असल्याचा किंवा खिडकीत आतल्या बाजूने उभे असल्यास जोडीला काही फरक पडत नसे. एक दिवस विचित्र आवाजात ओरडाओरड ऐकू आल्याने जवळ जाऊन पाहिलं तर हुपेचे दोन कोवळे जीव मरुन पडलेले होते व हुपेची जोडी आकांत करत होती. नंतर साळुंकीने भोकावर ताबा घेऊन संसार थाटला.

दुसरे उदाहरण उधमपूरचे आहे. माझे क्वार्टर्स पहिला मजल्यावर होते. खिडकी समोर खजुरीचे एक झाड होते. त्यावर Large green barbet तेव्हा मी त्याला लाल मोठा तांबट म्हणायचो, तो खोदकाम करत होता. झाड तेव्हा खिडकीपासून ३/४ मीटर दूरवर असल्याने आडून सहज दिसत होता. आपण एखादं कष्टाचं काम केल्यास श्वास घेतो तसा तोही दमायचा, थोडावेळ थांबून परत खोदकाम सुरु. सुमारे ८/१० दिवसांनी खोदकाम पुरे झाले. खोदकाम झाल्यावर तांबट एका सायंकाळी भोकात येऊन बसला. आम्ही तांबटचा पाळणा कधी हलतो याची वाट पहात होतो. दुसऱ्या दिवशी साळुक्यांच्या थव्याने त्याला घरातून हुसकून लावले. दोन दिवस आम्ही तांबटच्या बाजूने उभे राहिलो. साळुक्यांनी हुसकून लावल्यावरही तांबट बिळावर येत असे. तीन चार दिवसानी मात्र तांबट आढळला नाही. साळुक्यांनी आयत्या बिळात घरोबा केला. डॉ. पांडे फोटोग्रॉफी बरोबर स्केच पण काढतात. त्यांनी साळुंकीच्या काढलेल्या चित्राला संस्कृत नाव देताना **'कलहप्रिया'** असा उल्लेख केला होता. संत तुकाराम महाराज म्हणतात,

**साळुखी मंजुळ बोलतसे वाणी । बोलविता धनी वेगळाची।।**

**आता असे म्हणावे लागेल....**

साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । परी स्वभावे असे अति नतद्रष्ट

कलहप्रिया किंवा देवकुलचटक या नावावरून आपले पूर्वज पक्षी मित्र व निरीक्षक पण तेव्हढेच होते. साळुंकी हा स्वभाव येथे पण जाणवतो.

माझ्या परस बागेत ८ बाय ४ बाय ३ फूट आकाराची पुष्करणी आहे. त्यामध्ये रंगीत मासे सोडले आहेत आणि कमळे लावली आहेत. शेजारीच पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी, आंघोळ करणेसाठी १ १/२ फूट व्यासाचे २ खोल असे दगडी बेसीन बसविले आहेत. यावर अनेक पक्षी पाणी प्यायला, अंघोळीला येतात. प्रत्येकाची तहा वेगळी. बुलबुल, सातभाई, काळू, दयाळ सचैल स्नान करतात. कवडे फक्त पाणी प्यायला येतात. सातभाई, बुलबुल, दयाळ यांचे सहस्नान चालते पण

साळुंकी आली की, इतरांना हुसकावून लावते. या स्नान गृहावर कोकीळ, सोनपाठी सुतार, वसंत, हरेवा, भिलकवडा इत्यादींनी भेट दिली आहे. दयाळ सातभाई यांना जवळ वावरत असलेले चालते. बेसीनच्या टोकावर जाळीदार कापड आहे त्यावर मधमाशा येतात.

पक्ष्यांना खायला काय आवडते हे पहाणे पण आनंददायक आहे. वड, पिंपळ, पिंपरण, आसाणा ही पक्ष्यांची आवडती उपहारगृहे आहेत. सुमारे २०/२५ वर्षांपूर्वी घरापासून चिपळूणला जाईपर्यंत अनेक वड, पिंपळाची झाडे होती. माझ्या पहाण्याप्रमाणे रस्त्यावरचे सर्व वड एकाचवेळी बहरावर येत नाहीत. त्यात थोडेफार पुढेमागे असते हा निसर्गाचाच चमत्कार म्हणावा काय? अनेक वेळा बुलबुल पक्षी एका विशिष्ट झाडावर त्याची लहान फळे खाताना आढळत. आपले कोकणातले स्पेशल कुळीथ पिठले ज्या कुळीथ कडधान्यापासून करतात त्या कुळीथासारखी चपटी लहान फळे या झाडावर लागतात. या झाडाच्या नावाची चौकशी केली असता नाव कळले नाही म्हणून मी याला पक्षी मेवा या नावाने ओळखू लागलो. एकदा या झाडाची फळे चाखून पाहिली असता विशेष चव लागली नाही. बुलबुल आपसात म्हणाले असतील बंदर क्या जाने अदरखका स्वाद ? हे झाड फार लवकर वाढते त्याचप्रमाणे दहा बारा वर्षांनी वाळून जाते किंवा उन्मळून पडते. परंतु त्याचे लाकूड लवकर खराब होत नाही किंवा कुजत नाही. या लाकडाचा कोरीव कामाकरिता उपयोग होऊ शकतो. या झाडाचे नाव 'सिंगापूर चेरी' Mantingia calabura असून हे नाव श्री. मयूर नंदीकर यांजकडून कळले. श्री. नंदीकर, शिरवळ (सातारा) येथील गोदरेज सेंटर फॉर प्लॅन्ट रिसर्च या संस्थेत शास्त्रज्ञ म्हणून आहेत. श्री. नंदीकर यांचेकडून वनस्पती संबंधात अनेक शंकांचे निरसन झाले. त्यांना कोकणातील 'रहाट किंजळ' Sageraea laurifolia या दुर्मीळ झाडाचा फुलोरा पहाण्यासाठी ते आले असता या झाडाची मी वाढविलेली रोपेही दिली आहेत.

पोपटांना हिरवी मिरची, कैरीपण आवडते. पोपट कैरीच्या आतली कोवळी कोयच खातो. कोकीळला पेरू, पपई जेवढी प्रिय आहे तेवढीच मिरी, मेवा (मलबारी), शिवलिंगीच्या बिया पण आवडतात. शिविलिंगी कारल्याच्या वेलासारखी दिसणारी वेल असून तिला बोरा एवढी फळे येतात. त्यावर भस्म लावल्यासारखे पांढरे पट्टे असतात म्हणून शिवलिंगी. फुलटोच्या, शिंजीर यांची त-हाच निराळी. फुलटोच्या प्रमाणे चिपका फुलातील मकरंद खातो. कोकीळ पिकलेले भोकरपण खाते. महाराष्ट्र राज्य पक्षी हरियल पक्ष्यांचा थवा आसाण्याच्या बिया खाताना मंजुळ शीळ घालत मनोरंजनच करतो व फळे खाणेसाठी लोंबतो ते फारच सुंदर. पांगारा, पळस, शेवर, इत्यादी वनस्पती म्हणजे पक्ष्यांच्या खास रसवंतीच... सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत तुफान गर्दी खेचतात.

बुलबुल तगरीवर होणारे सुरवंटाचे कोष अलगद उघडून त्यातील अळी खातात. पण हेच बुलबुल अमरलियास किंवा लिलीच्या पानावर आढळणाऱ्या रंगीत अळ्यांकडे अजिबात पहात नाहीत. काकडी फुलायला लागली की बुलबुल त्याची फुले तोडुन टाकतात पण खात नाहीत. कारण न कळे... काजरा हे विषारी बी असणारे रान झाड आहे. त्याची फळे धनेश पक्ष्यांची आवडती फळे आहेत. काळू पक्षी करमळच्या (Star fruit) फळांवर ताव मारताना खूपदा दिसतो.

आंबा कलमावर वर उंच असलेला एखादाच आंबा असा पुरवून पुरवून खाल्लेला असतो. त्याची बाट एकदोन दिवस तशीच देठाला लोंबकळत असते, हे पाहून त्यांचा राग येण्याऐवजी दादच द्यावी लागते. सहचरणीला खुश करण्यासाठी पारवा घुमतो. मोर पंख पसरुन नाचतो, कोंबडा पायातील जमीन उकरताना सापडलेली अळी स्वत: न खाता कोंबडीला दाखवून देतो... हे सर्वश्रुत आहे. मी एका कोतवाल जोडीला नारळाच्या झावळीवर प्रणयाराधन करताना पाहिले आहे. त्यामध्ये कोतवाल लहान लहान उडया मारत मादीच्या जवळ जवळ नाचतो.

आवाजाची नक्कल करणारे म्हणून अनेक पक्ष्यांची ओळख आहे. मी कस्तुरचा छान अनुभव घेतला आहे. पावसाळी दिवसात कस्तुरची शीळ ऐकल्यावर आपण त्याची नक्कल केली तर तो परत परत ओरडतो. आपण नक्कल

केल्यास असे जलद आवाज काढतो की त्याची नक्कल करणे जमत नाही. कोकीळही नक्कल केल्यावर आवाजाची धार वाढवत प्रत्युत्तर देतो. इंग्रजांचा ब्रेनफिवर बर्ड म्हणजे पावशा आपल्याकडे पेरते व्हा - पेरते व्हा असे खूप वेळ ओरडत असतो. योगायोग असावा पण आपलेकडे हीच पेरणीची वेळ आहे. वाघळांचे तीन प्रकार मला माहीत आहेत. आमच्या वीज मीटर व भिंतीच्या फटीत लहान वाघळांची लपायची जागा होती. तसेच माडीवरच्या खिडकीवरच्या फटीत वाघळांचे वास्तव्य असायचे. आमची मनी खिडकीच्या झडपेवर बसून त्याची शिकार करत असे. गिधाड संर्वधन कामानिमित्त केळशीला जाणे होत असे. परत येताना आडे येथील पुलावर सायंकाळी शेकडोंच्या संख्येत मोठी वाघळे दूरवर खाडीकाठच्या जंगलातून अन्न शोधण्यासाठी बाहेर जाण्याच्या तयारीत असत. कोल्हापूरच्या टाउन हॉल जवळच्या झाडांवर शेकडो झुंबरे लटकवून ठेवावीत त्याप्रमाणे वाघळे लटकत असतात. कोकणात सुपाऱ्या तयार झाल्यावर त्याची साल चावून चावून वाघळे खात असत, अशी सुपारी वाळत घालण्याअगोदर त्याची साल काढण्याची आवश्यकता नसे. उंडल हे पण कोकणातील सुरंगीसारखे छान वास येणारे फुलझाड आहे. उंडीणीला लिंबाएव्हडी फळे लागतात. उंडीच्या फळांची सालही वाघळे आवडीने खातात. उंडीपासून औषधे कडू तेल मिळते. वाघळांचा बीज प्रसारण, कीटक, डास प्रतिबंधासाठी उपयोगच आहे.

पक्षी मित्र हा फक्त पक्षी मित्र जसे शुध्द शाकाहारी असू शकतो काय ? माझ्या मते प्रत्येक पक्षी मित्रांना निसर्गाचे इतर घटक जसे माती, पाणी, पशू, फुलपाखरे यांचे पण मित्र असणे आवश्यक आहे. हिवाळ्यात कोळ्यांच्या जाळ्यावर सूर्यकिरणे पडल्यावर चमकणा-या दवबिंदूंना इंद्रधनुष्याची शोभा येते. पावसाळयात सितेचे डोळे, तेरडा, कवळा, रानभेंडी तर हिवाळ्यात तांब, गंगोत्री, शेतवड,पिवळा धोत्रा, गोरखमुंडी यासारख्या वनस्पतींचे रंग नयन सुख देणारे असतात. विविध रंगांची फुलपाखरे, पतंग तर पहात रहावे.

प्रत्येकाचे पक्षी निरीक्षण विशिष्ट कोनातून असू शकते. जसे पक्षी इतर घटकांची खाद्य म्हणून शिकार करतात तशी पक्ष्यांची पण खाद्यासाठी शिकार होतच असते. लहान पक्षी मोठ्या पक्ष्यांचे खाद्य आहेच. मी एक फुरसे पक्षाला विळखा घालून बिळात घेऊन जाताना पाहिले आहे. बगळे लहान बेडकी पकडून झाडावर बसून टोचत असतात, त्या वेळी बेडकी जो विशिष्ट आवाज काढते तो ऐकवत नाही. सातभाई व इतर पक्षी साप,मांजर इत्यादी शिकारी प्राण्याला पाहिल्यानंतर विशिष्ट आवाज काढून इतरांना सावध करत असतात. लहानपणी आजोळी शीर येथे निर्सगाची आवड लागली ती पुढे जन्मभर धकधकीच्या जीवनात जेवढी जोपासता येईल तेवढी जोपासली.

पक्षी हा मित्र किंवा हवाहवासा वाटणारा पाहुणा समजुन त्याची सरबराई करणेचा प्रयत्न केला व करतो आहे. त्यासाठी आसाणा, धामण, पळस, आंबा, जांभूळ, कणेर, पांढरफळी, करवंद, तोरण, काजरा, शेवर, पांगारा इत्यादी झाडे लावली किंवा आपणहून उगवलेली सांभाळली. सातभाई सारख्या पक्ष्यांना पालापाचोळा विस्कटून भक्ष्य शोधण्याची आवड असते. बांबू बेटाच्या जवळपास पालापाचोळा टाकून त्यांची सोय करतो.

(क्रमशः)

******

# जेव्हा स्वर्गीय नर्तक भेटतो तेव्हा...



ऐश्वर्या भोसले
सातारा

१२ जानेवारी पक्षीमित्र संमेलन संपल्यावर आम्ही फणसाड अभयारण्याकडे निघालो रात्री दहा पर्यंत पोहचून नाईटजार भारतीय रातवा पक्ष्याचा शोधात निघायचं असं ठरलं होत. पण पोहचायला बारा-साडेबारा झाले आणि राहण्याची व्यवस्था होईपर्यंत आयोजक कंटाळले होते मग नाईटजार चा प्लान पहाटे साडेपाच चा केला. साधारण दिड वाजता आम्ही झोपलो. नेहमीचा साडेपाच चा गजर होण्या आधीच पाच वाजता जाग आली. झोप पूर्ण झाली नव्हती पण जंगल बघायला मिळणार म्हणून मी खूप खुश होते. ५.४५ ला आम्ही सगळे एका ठिकाणी जमलो. अंधार बराच होता काही जणांकडे टॉर्च होती, माझ्याकडे  कॅमेरा होता, पण अंधारात काही फायदा होईल असं वाटत नव्हत साधारण एक ते दीड ला जंगलात गेलो असू पण नाईटजार पक्ष्याचा कॉल ऐकू येत होता. म्हणजे आमच्या सोबत आवाजावरून पक्षी ओळखणारे बरेच तज्ज्ञ होते. मी मात्र अरे इथे बघा म्हणालं की मान वळवायचे आणि इकडून आवाज येतोय म्हणालं की तिकडे कान द्यायचं या कॅटेगरी मधील होते. कुणाला तरी बॅटरीच्या प्रकाशात नाईटजार दिसला. आम्ही मात्र आवाजावर  समाधान मानलं. झालं परत आलो मूळ ठिकाणी. पोटभर नाश्ता आणि चहा मिळाला.आता मिशन फणसाड ला आम्ही तयार. दोन ग्रुप केले ६ किमी आणि १२ किमी. शेवटपर्यंत मी कन्फ्युजन मध्ये होते कुठला ग्रूप जॉइन करू? पण जास्तीत जास्त जंगल फिरायला मिळेल म्हणून १२ कि.मी. ग्रूप जॉईन केला. आणि निघालो सर्वेश अभ्यंकर आमचा टीम लीडर होता. सुरवात लीफबर्ड पासून झाली. मग हळू हळू अनेक पक्ष्यांचा हालचाली, आवाज, कोतवाल पक्षी मात्र कोतवालासारखा आमच्यावर नजर ठेऊन होता. बऱ्याच जणांकडे दुर्बीणी होत्या. खरंतर बर्डवॉचींग काय असतं हे मी पहिल्यांदा अनुभवत होते. या आधी घराजवळ आणि बँकेच्या येण्या जाण्याच्या रस्त्यावरचे पक्ष्यांचे फोटो काढले होते. थोडक्यात काय सगळं नवीन आणि मस्त होत. इकडून तिकडून दुर्बीण (उसनी )मागून मी पक्षी बघत होते. बऱ्याच नवीन पक्षांची नाव कळली. तर आता वळूया महत्वाच्या गोष्टीकडे.

जेव्हापासून पक्ष्यांमध्ये इन्ट्रेस्ट वाटू लागला तेव्हापासून इंडीयन पॅराडाईज फ्लायकॅचर स्वर्गीय नर्तक माझा ड्रीम बर्ड अनेक ठिकाणी मी त्याचे फोटो पहिले होते पण अॅक्चुअल कधी दिसला नाही. मागच्या वर्षी पन्हाळ्याला गेले होते तिथे तबक उद्यानात मी त्या पक्षाचे वास्तव्य आहे असे वाचले पण निराशा झाली. तर हा स्वर्गीय नर्तक बघायची मला खुप मनापासून ईच्छा होती... तेवढ्यात तज्ज्ञ मंडळींमध्ये कुणाला तरी स्वर्गीय नर्तक दिसलां आणि त्यावेळी माझ्या उसनी दुर्बीण मिळवण्याच्या नादात तो गायब झाला.

आता फणसाडचा आणि १०-१२ कि.मी. पायपिटीचा काही फायदा होईल का असं वाटू लागलं. तेवढ्यात आमच्या को-ऑर्डीनेटर नी डायलॉग मारला... ''मनात असेल तरच पक्षी दिसतातं.'' म्हणजे माझ्या मानत होतच पहिल्यापासून पण आता अजून आलं. आम्ही सगळे जण अंदाजे ४-५ कि.मी. चालत आलो होतो पण मी अजून कॅमेराच उदघाटन केलं नव्हतं. जे पण पक्षी दिसत होते ते खूप लांब. आवाजावरच समाधान मानव लागत होत. एका ठिकाणी माळ लागला तिथे सगळे जण थांबले. तिथं एक मचाण पण होती बर्डवॉचर साठी. जी मंडळी वर चढली ती बऱ्याच पक्ष्यांची नावे घेत होती. माझा मनात मात्र स्वर्गीय नर्तक नाचत होता. बराच वेळ झाला सगळे जण तिथेच रमले होते. आमच्यातले काही जण माघारी निघाले आलेल्या वाटेवरून मी पण त्यांच्याबरोबर निघाले. एकही छान फोटो नाही मी सारखी कॅमेरा कडे पाहत होते. तेवढयात मलबार ग्रे हॉर्नबील मलबारी शलाटी धनेश दिसला आणि आशा पल्लवित झाल्या २-३ फोटो मिळाले. मग काय आता फक्त स्वर्गीय नर्तकाचा ध्यास लागला होता ! तस मी सोबतच्यांना बोलूनही दाखवलं. बास आज तो दिसला पाहिजे दिवस कारणी लागेल माझा.आता आम्ही बरेच पुढे आलो होतो. मागची लोक दिसेनाशी झाली.आम्ही ५-६ जण पुढे आलो होतो आणि काय हॉर्नबील च्या चर्चेत असतानाच जंगलाच्या या बाजूने त्या बाजूला इंद्रधनुष्यासारखा

तो उडून गेला. एक क्षणभर मला माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना.तो क्षण डोळेभरून पाहताना मी एवढी तल्लीन झाले की फोटो काढायचं राहून गेलं. लव्ह एट फस्ट साईट. काय असतं हे मला जाणवलं ते देखणं पांढर शुभ्र रूप आणि मनाचे तरंग वाऱ्यावर फिरावे तशी अलगद फिरणारी लांब लचक शेपटी स्वर्ग म्हणजे हाच का? असा तो क्षण आणि मी त्यासाठीच पाहिलेली वाट सगळं कस साधून आलं होत. वाटलं बास तो आनंद माझ्या चेहऱ्यावर इतका वाटत होता की सोबतच कुणीतरी म्हणालं सुद्धा बघा तिच्या चेहऱ्यावरचा आनंद तिथून आम्ही बरंच पुढे आलो. परत आमच्यातली दोघ मागे थांबली.आता आम्ही तिघेच होते एक नाशिक चे सिनियर सिटीझन हसबंड –वाईफ होते आणि मी तेवढ्यात लक्षात आलं की बाकीचे दुसऱ्या रस्त्याने शॉर्ट कट ने गेलेत असो ! आता मात्र जंगलातली शांतता आणि मधूनच येणारा पक्ष्यांचा आवाज जवळून अनुभवता आला. डोक्यात स्वर्गीय नर्तकाने एव्हाना घर केलं होत मी मनापासून माझ्या मित्रांना साद घालत होते. मित्रानो एकदा परत दिसा. तेढ्यात स्वर्गीय नर्तक पुढ्यात..मग काय एके ४७ सुरु झाल्यासारखी मी फोटो काढले आणि त्या बाईंनी सुद्धा भरपूर पोज देऊन काढून घेतले. ची स्वर्गीय नर्तकांनी मात्र परत दर्शन नाही दिले. पण प्यार करने वालोंको एक झलक ही काफी हैं... हे वाक्य सुद्धा आज डोक्यात टिक टिक करू लागलं म्हणजे अगदी या हृदयीच त्या हृदयी होऊन दोघं मलाच भेटायला आणि मग त्या स्वर्गीय नर्तक फोटो काढून घ्यायला आल्या होत्या असे वाटले.

******

## स्वागत नवीन सभासदांचे

(दि.१ जुलै २०२० ते ३० सप्टेंबर २०२०)

| क्रमांक | नाव | गाव | फोन | ईमेल |
|---|---|---|---|---|
| १२०६ | श्री. कुणाल उ. बोरकर | ठाणे | 9819444568 | kunalborkar@gmail.co |
| १२०७ | श्री. कल्पक वि. चिंदारकर | मुंबई | 9967070154 | kalpakvc@yahoo.co.in |
| १२०८ | डॉ. भाग्यश्री वि. टिळक | मुंबई | 9869269208 | bhtilak@gmail.com |
| १२०९ | श्री. मा. अभिमन्यू काळे | मुंबई | 9869405001 | md@maharashtratourism.gov.in |
| १२१० | श्री. संजय दि. जोशी | ठाणे | 8879169187 | sanjay.joshi1958@gmail.com |
| १२११ | अश्विनी देवस्थळी | ठाणे | 97694110031 | deosthalee@gmail.com |
| १२१२ | डॉ. माधुरी सु. हिंगणकर | अकोट | 8275283176 | hingankar.madhu@gmail.com |
| १२१३ | श्री. श्रीरंग देशिंगकर | कोल्हापूर | 9822653142 | ssdeshingkar@gmail.com |
| १२१४ | श्री. सुधाकर भि. गायकवाड | औरंगाबाद | 9822038892 | sbg.2007@gmail.com |
| १२१५ | कु. स्वप्नाली ग. सोनावणे | ठाणे | 8424009435 | swapnali1213@gmail.com |
| १२१६ | श्री. संजय स. केळकर | पुणे | 9823010203 | sanjaykelkar561@gmail.com |
| १२१७ | नेहा वि. ताम्हणकर | दापोली | 7058896386 | nehatamhankar@gmail.com |

| क्रमांक | नाव | गाव | फोन | ईमेल |
|---|---|---|---|---|
| १२१८ | डॉ. पूनम प्र. निहुटकर | ठाणे | 9850044656 | punampraful@gmail.com |
| १२१९ | श्री. अक्षय प्र. पाटील | नाशिक | 9922775568 | 007akshaypatil@gmail |
| १२२० | श्री. विक्रांत श्री. रामटेके | अमरावती | 9021536621 | vikrantram29@gmail.com |
| १२२१ | सौ. वैशाली ह. फुलकर | चंद्रपूर | 9422171967 | vaishalifulkar@gmail.com |
| १२२२ | श्री. संदीप नि. गायकवाड | पुणे | 9764805454 | sandip1504@gmail.com |
| १२२३ | डॉ. पवन प. राठोड | अमरावती | 9764600501 | poneprince@gmail.com |
| १२२४ | श्री. संजय पंडित | मुंबई | 9930864985 | sanjaypandit_2k@gmail.com |
| १२२५ | प्रा. डॉ. शेख यास्मिन | औरंगाबाद | 8149907211 | shaikhyasmeen7862@gmail.com |
| १२२६ | प्रा. प्राजक्ता नि. बाठे | नांदुरा | 8975719321 | prajaktabathe12@gmail.com |
| १२२७ | श्री. शरद ना. वासनकर | जामनेर | 9421613587 | vasankar1975.sv@gmail.com |
| १२२८ | श्री. सुधीर त्र. राठोड | मुंबई | 9423601109 | sudhirrathod007@gmail.com |
| १२२९ | प्रिया दि. कराडकर | डोंबिवली | 8655788679 | priya.karadkar@gmail.com |
| १२३० | स्मिता वा. देसाई | कांदिवली | 9167512646 | desaimanu@gmail.com |
| १२३१ | डॉ. सुजित नरवाडे | सोलापूर | 9405749140 | sujitsnarwade@gmail.com |
| १२३२ | अनुजा सावंत | कॅनडा | | anuja.sawant@gmail.com |
| १२३३ | डॉ. मेघा रणजीत सोळंके | शेगाव | 9822628050 | megha30.solanke@gmail.com |
| १२३४ | कु. सोनाली अनिल तायडे | अमरावती | 7262982878 | sonali.tayde96@gmail. |
| १२३५ | श्री. श्रीपाद अ. पैठणकर | पुणे | 9822711341 | tshripad@gmail.com |
| १२३६ | सौ. अनुश्री आशुतोष दीक्षित | नाशिक | 9822976702 | anushreedixit1976@gmail.com |

******

# महाराष्ट्र पक्षीमित्रचे

## आजच सभासद व्हा

आजीवन सभासद शुल्क रु ५००/- + ५००/- (अंक निधी)
आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे अमरावती. येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बैंक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती.
खात्याने नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र,
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
IFSC Code - MAHB0000639
खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदाचा अर्ज भरुन पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे-इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :- महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ.गजानन वाघ अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com
Website : www.pakshimitra.org

---

### त्रैमासिक अंक निधी

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/- ते ६०,०००/-रुपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुध्दा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## सभासद अर्ज

प्रति,

मा.अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षीमित्र

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्टे मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे कोटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

फोन नं. __________ मो. __________

ई-मेल ____________________

जन्मतारीख : ____________________

शिक्षण : ____________________

नोकरी/व्यवसाय : ____________________

छंद : ____________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D./Money Order / Core Bank System)

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.

श्री/श्रीमती __________ यांनी सुचविल्यावरुन सभासदत्व घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | **अध्यक्ष** | आपला |
| **अर्ज मंजूर/नामंजूर** | **महाराष्ट्र पक्षीमित्र** | सही |

**महाराष्ट्र पक्षीमित्र ला देण्यात येणाऱ्या सर्व देणग्या 80 G अन्वये सवलत पात्र आहेत.**

# पाखरे म्हणती...



राघवेंद्र वंजारी
सोलापूर

पाखरे म्हणती...
बंदिवासात तुझ्या मानवा
सौख्य लाभले जीवा
नुसतेच म्हणतो निसर्गप्रेमी
वागतो नेहमीच दुष्कर्मी...

पाखरे म्हणती...
मोकळे झाले गाव सारे
निश्चल झाल्या वाटा साऱ्या
स्वच्छंदी उडती सगेसोयरे
शहरातही भासे दऱ्याखोऱ्या...

पाखरे म्हणती...
संचारबंदी हीच मर्यादेची भाषा
मनाशी ठेवतो एकच अभिलाषा
विषाणूला बसुदे कायमचा आळा...
सततची भरु दे ही बंदीशाळा...
सततची भरु दे ही बंदीशाळा...

******

## ब्रिटनमधील सर्वात मोठी आर्क्टिक टर्नची वसाहत खालसा

आर्क्टिक टर्न हा पक्षी दक्षिण ध्रुव ते उत्तर ध्रुव व परत अशा दीर्घ स्थलांतरासाठी प्रसिद्ध आहे. ग्रेट ब्रिटनमधील आर्क्टिक टर्नची सर्वात मोठी वसाहत स्केरिज या खडकाळ बेटावर असते. २०१९ साली त्या वसाहतीत २८१४ जोड्यांनी पिले दिली होती. पण २०20 साली त्या ठिकाणी एकही आर्क्टिक टर्न पक्षी अवतरला नाही.

कोविडच्या साथीमुळे त्या बेटावर एकही रक्षक पोहोचू शकला नाही. त्याच्या गैरहजेरीत काही पेरिग्रीन फाल्कन या शिकारी पक्ष्यांनी तिकडे मोर्चा वळवला. परिणामी टर्नची वसाहत खालसा झाली असावी.

Book Post

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षिमित्र**
संपादक : **दिगंबर गाडगीळ**
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
मुद्रक : ज्ञानपथ प्रिंटर्स अॅन्ड ग्राफिक्स,
अमरावती